स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
सत्यमेव जयते
# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
सारथी
बालचित्रवाणी इमारत , गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४
Email ID : sarthipune@gmail.com | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे प्रायोजित व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT), तळेगाव दाभाडे, पुणे या संस्थेव्दारा नि:शुल्क क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम

सारथी संस्थेच्या वतीने **राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) , तळेगाव दाभाडे,पुणे** येथे मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा- कुणबी या लक्षित गटाचे उच्च कृषी तंत्रज्ञानावर अधारित निवासी **क्षमता बांधणी** प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत पात्रता धारक शेतकरी/युवक/युवती कडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

### प्रशिक्षण तपशील-

| अ. क्र. | प्रशिक्षण विषय | कालावधी | बॅच प्रशिक्षणार्थी संख्या | प्रशिक्षण शुल्क (जीएसटी वगळून) रु. * |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **अ** | **फलोत्पादन उत्पादन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण** | | | |
| १ | हरितगृह व्यवस्थापन | ५ दिवस | ४० | ७००० |
| २ | शेड नेट हाऊस व्यवस्थापन | ५ दिवस | ४० | ७००० |
| ३ | रोपाची अभिवृध्दी आणि भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन. | ५ दिवस | ४० | ७००० |
| **ब** | **फलोत्पादन व्यवस्थापन प्रशिक्षण** | | | |
| ४ | लँडस्केप व्यवस्थापन | ५ दिवस | ४० | ७५०० |
| ५ | ऊति संवर्धन तंत्रज्ञान | ५ दिवस | ४० | ७५०० |
| ६ | ड्रायफ्लॉवर,प्लँट पार्टस् आणि पुष्प रचना | ३ दिवस | ४० | ४५०० |
| **क** | **फलोत्पादन उत्पादन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण** | | | |
| ७ | पीक निहाय प्रशिक्षण कार्यक्रम - फुल पिके- गुलाब, जरबेरा कार्नेशन,प्रक्षेत्रावरील फुलांची/ फिलरची लागवड | ५ दिवस | ४० | ७००० |
| ८ | पीक निहाय प्रशिक्षण कार्यक्रम - भाजीपाला -शिमला मिरची, चेरी टोमॅटो, काकडी | ५ दिवस | ४० | ७००० |
| **ड** | **काढणी पश्चात प्रशिक्षण** | | | |
| ९ | फळ पिके व भाजीपाला यांचे काढणीपश्चात व्यवस्थापन | ३ दिवस | ४० | ४५०० |
| १० | पुरवठा साखळी व्यवस्थापन | ३ दिवस | ४० | ४५०० |

**प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवड करिता अटी व शर्ती-**

१) उमेदवार मराठा, कुणबी, कुणबी- मराठा व मराठा- कुणबी या प्रवर्गातील असावा,

२) उमेदवारचे वय 18 ते 50 वर्ष या दरम्यान असावे.

३) उमेदवारांचे मागील 3 वर्षाचे वार्षिक अर्थिक उत्पन्न हे रु. 8,00,000/- पेक्षा कमी असावे.

४) उमेदवाराचा महाराष्ट्र राज्यामध्ये अधिवास असावा.

५) इच्छुक पात्रता धारक उमेदवारानी खालील कागदपत्रे अर्जासोबत सादर(अपलोड) करावीत.

अ) विहित नमुन्यातील व फोटोसहीत परिपूर्ण अर्ज

आ) विहित नमुन्यातील प्रतिज्ञा पत्र

इ) जातीचे प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला ( टी सी / एल सी)

ई) लाभाचे आर्थिक वर्षासाठी वैध उत्पन्नाचे प्रमाणपत्र -
नॉन क्रिमिलेयर / तहसिलदार दाखला / ई डब्ल्यू एस

उ) रहिवाशी प्रमाणपत्र/ ईडब्ल्यूएस/ ७/१२ उतारा

ऊ) आधार कार्ड

**सर्वसाधारण सुचना-**

i) प्रशिक्षणाचे माध्यम मराठी असेल.

ii) सदर **क्षमता बांधणी** प्रशिक्षणे ही पूर्णकालीन निवासी असून प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च सारथी पुणे यांच्या मार्फत करण्यात येईल.

iii) सदर क्षमता बांधणी प्रशिक्षण **राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) मार्फत तळेगाव (दाभाडे), जिल्हा पुणे** येथे आयोजित करण्यात येईल.

iv) प्राप्त अर्जामधून निकषांच्या आधारे अर्जाची छाननी करून क्रमवार निवडक पात्र उमेदवारांची यादी NIPHT व सारथीचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल,

v) ईच्छुक उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज सारथी संकेतस्थळ https://sarthi-maharashtragov.inव्दारे अथवा थेट NIPHT चे संकेतस्थळ http://www.nipht.org वरील लिंक https://sarthi.nipht.org/ व्दारे सादर करावेत.

vi) अपूर्ण असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

vii) प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणेसाठी येणारा प्रवास खर्च संबंधित प्रशिक्षणार्थींना स्वतः करावा लागेल..

viii) प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेवारांची यादी सारथी व NIPHT च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

ix) बॅच तयार झाल्यावर उर्वरीत पात्र प्रसिक्षणार्थींचा विचार पुढील बॅचसाठी केला जाईल, याबाबतच्या सूचना सारथी व NIPHT संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

६) प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर उमेदवारास प्रशिक्षणास गैरहजर राहता येणार नाही अथवा प्रशिक्षण मध्येच सोडून जाता येणार नाही.

७) प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे घटक, कालावधी व प्रवेश क्षमतेबाबतचे सर्व अधिकार सारथी व NIPHT संस्थेकडे राखीव असतील.

८) प्रशिक्षण स्थळ पत्ता :-राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, सर्व्हे क्र. ३९८-४०० CRPF कॅम्प जवळ, जुना पुणे-मुंबई महामार्ग. तळेगाव-दाभाडे, पुणे - ४१० ५०६,

९) प्रशिक्षण समन्वयक- श्री. विश्वास जाधव, व्यवस्थापक(प्रशिक्षण)- 9423085894 कार्यालय - 02114- 255480

ठिकाण- पुणे
दिनांक- २ ऑगस्ट,२०२३

Ashokkakade

**( श्री. अशोक काकडे) भा.प्र.से.**
**व्यवस्थापकीय संचालक,सारथी, पुणे.**